# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 07/12/2019 (शनिवार)
# (सकाळ)

---

## मोटरसायकल चोरी

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 5 कि. मी. अंतरावर कान्व्हा शिवार येथे दिनांक 05/12/2019 चे 09:00 वा. ते 09:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अभिलेख विजय बेंडे, वय 24 वर्ष, रा. कानव्हा यांचे मामा नामे– किशोर यंबलवार यांनी फिर्यादींची एमएच–40/ टी–3280 क्रमांकाची हिरो होन्डा मोटरसायकल सुनिल भोयर, रा. कानव्हा यांचे शेतात कार्यक्रमाकरीता घेवुन गेला व गाडी बाजुला उभी ठेवली होती. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. 10,000/–रू. ची मोटरसायकल चोरी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार जयसिंगपुरे हे करीत आहे.

2) पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावर मौजा गोंडपिंपरी पुर्णवसन येथे दिनांक 28/11/2019 चे 20:00 वा. ते दिनांक 29/11/2019 चे 01:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रविण फुलचंद घरडे, वय 30 वर्ष, रा. तारोली ता. कुही यांनी त्यांचे लहान भाऊ नामे– संतोष घरडे यांची एमएच–40/एजे–9770 क्रमांकाची हिरो होन्डा स्प्लेंडर मोटरसायकल घेवून तारोली येथून गोंडपिपरी पुर्णवसन येथे भिममेळावा कार्यक्रम पाहण्याकरीता गेले होते. फिर्यादीने त्यांची मोटरसायकल हॅंडल लॉक करून तेथे पार्किंग मध्ये ठेवली होती. फिर्यादी हे कार्यक्रम पाहून रात्री 01:30 वा. पार्किंगमध्ये मोटरसायकल आणण्याकरीता गेले असता त्यांना मोटरसायकल दिसून आली नाही. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. 22,000/–रू. ची मोटरसायकल चोरी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ यादवराव कुमरे हे करीत आहे.

# दुखापत

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 13 कि. मी. अंतरावर मौजा साखरखेडा येथे दिनांक 06/12/2019 चे 09:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– पंकज सिताराम जोगेकर, वय 28 वर्ष, रा. साखरखेडा, ता. नरखेड हे आरोपी नामे– भोजराज रामादेव जराये, रा. साखरखेडा, ता. नरखेड यास मजुरीचे पैसे मागायला गेले होते. दरम्यान आरोपीने फिर्यादीस 300/–रू. दिले, तर फिर्यादीने मजुरीचे पुर्ण पैसे मागीतले. या कारणावरून आरोपीने फिर्यादीस झगडा भांडण करून फिर्यादींना हातबुक्कीने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 324 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक मोरेश्वर चलपे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर